राज्य नदी संवर्धन योजनेतंर्गत दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद, जि. धुळे यांच्या अमरावती व भोगावती नदी संवर्धन प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रानयो २०१९/प्र.क्र.१९/तां.क.३
नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक - ११/०९/२०१९.

वाचा -

१) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.२५/तां.क.१, दिनांक - ०१/०३/२०१४.
२) केंद्रीय नदी संवर्धन संचालनालयाने नदी संवर्धन योजनेसाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.
३) राज्य नदी संवर्धन योजनेतंर्गत सचिव स्तरावरील प्रदत्त समितीच्या दिनांक ०९/०८/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना-

राज्यातील नद्यांचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य नदी संवर्धन योजना दिनांक ०१/०३/२०१४ रोजीपासून सुरु केली आहे. या योजनेतंर्गत सर्वसाधारणपणे खालील कामांचा समावेश होतो.

१) शहरातून / गावातून निघणारे सांडपाणी नदीत ज्या ठिकाणी सोडले जाते (Point Source) तेथून गोळा करणे, अडविणे, वळविणे व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेपर्यंत पोहचविणे इत्यादीसाठी उपाययोजना यामध्ये शहराच्या भुयारी गटार योजनेचा समावेश नाही.
२) सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाण्याचे प्रमाण, गुणवत्ता व स्थानिक भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन योग्य तंत्रज्ञानावर आधारीत सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व त्यास अनुषंगिक आवश्यक घटक इत्यादी उभारणे.
३) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा, प्रकल्पक्षेत्रातील किंवा जवळील शेती, उद्योगघटक, बागबगीचे इत्यादीमध्ये पुनर्वापर व पुनर्चक्रण शक्य होण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा / सुविधा / व्यवस्था इत्यादी उभारणे, जेणेकरुन याद्वारे मिळणाऱ्या महसूलातून प्रकल्पाच्या देखभालीचा इत्यादीबाबींचा खर्च भागविणे शक्य होईल.
४) नदीच्या जवळील भागात कमी किंमतीची स्वच्छतागृहे बांधणे, त्यामधून निघणारे सांडपाणी मलशुध्दीकरण यंत्रणेस जोडणे वा प्रक्रियेसाठी तत्सम उपाययोजना करणे इत्यादी.
५) नदी घाट विकास, नदी काठाची धूप रोखण्यासाठी उपाययोजना, नदीच्या स्त्रोताचे संवर्धन इत्यादी.
६) योजनेतंर्गत स्थापित कक्षाची, तंत्रज्ञांची क्षमता वृध्दी, प्रशिक्षण, संशोधन तसेच योजना विहित केलेल्या मानकांप्रमाणे यशस्वी होण्यासाठी आवश्यकतेनूसार सल्लागार / तज्ञ अभियंता इत्यादीची तात्पुरती नियुक्ती.
७) योजनेच्या स्थानिक परिस्थितीनूसार प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने इतर महत्वाची कामे, जसे, शास्त्रीय पध्दतीने नागरी घनकचरा व्यवस्थापन व विल्हेवाट, अपारंपारिक ऊर्जा निर्मिती व वापर लोक सहभाग इत्यादी कामे.

या योजनेतंर्गत मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचा, जि. धुळे यांच्याकडून प्राप्त अमरावतील व भोगावती नदी संवर्धन प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

राज्य नदी सवंर्धन योजनेतंर्गत मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचा, जि. धुळे यांच्याकडून प्राप्त अमरावती व भोगावती नदीचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धनासाठी सविस्तर प्रकल्प अहवालानूसार सोबत जोडलेल्या "प्रपत्र - अ" मध्ये नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी एकूण रुपये ११,००,६०,५२९.९०/- इतक्या रकमेस खालील अटी व सोबत जोडलेल्या "प्रपत्र - ब" मधील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर मंजूर एकूण रकमेपैकी ८०% हिस्सा राज्य शासन व २०% हिस्सा दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद, जि. धुळे यांचा राहील. निधी वितरीत करण्याबाबत स्वतंत्रपणे शासन निर्णयाद्वारे आदेश निर्गमित करण्यात येईल.

अ.क्र.	हिस्सा	मंजूर निधी	अक्षरी मंजूर निधी
१)	८०% राज्य शासन	८,८०,४८,४२३.९२/-	आठ कोटी ऐंशी लाख अठ्ठेचाळीस हजार चारशे तेवीस रुपये व ब्यान्नव पैसे फक्त
२)	२०% दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद	२,२०,१२,१०५.९८/-	दोन काटी वीस लाख बारा हजार एकशे पाच रुपये व अठ्ठ्यान्नव पैसे फक्त
एकूण		११,००,६०,५२९.९०/-	अकरा कोटी साठ हजार पाचशे एकोणतीस रुपये व नव्वद पैसे फक्त

अ) मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद यांनी प्रदत्त समितीपुढे सादर केलेला प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेण्यात यावी. त्यानंतरच तांत्रिक मान्यता प्राप्त प्रस्तावास दोन टप्प्यामध्ये निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

आ) एकूण मंजूर निधीपैकी २०% हिस्सा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नावे असलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा केल्यानंतरच शासनाचा ८०% हिस्सा दोन टप्प्यामध्ये वितरीत करण्यात येईल.

सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च हा मागणी क्र. यु - ४, ३४३५ परिस्थितीकी व पर्यावरण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (०१) पर्यावरण संरक्षण, (०१) (०१) राज्य नदी संवर्धन योजना (कार्यक्रम) (३४३५ १३२९), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रू.३९.५० कोटी इतक्या निधीपैकी अर्थसंकल्प नियतव्यय प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या ६०% म्हणजेच रू.२३.७० कोटी इतक्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली वर्गीकृत करण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं - २०१७/प्र.क्र.७५/अर्थ - ३, दिनांक १८/०४/२०१७ मधील परिच्छेद क्र. ७ ते १८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की, दिनांक १८/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टातील अनु. क्र. ३ व ८ मधील अटींची पूर्तता होत आहे.

तसेच सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं - २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

याशिवाय, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण - २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १०/०५/२०१६ अन्वये खलील बाबींची पूर्तता होत आहे.

१) सदर प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाची मान्यता घेण्यात आलेली आहे.
२) मौजे दोंडाईचा - वरवाडे, जि. धुळे येथील अमरावती व भोगावती नदी संवर्धन प्रस्तावासाठी एकूण रु. ११,००,६०,५२९.९०/- एवढया निधीमधील राज्य हिस्सा (८०%) रु. ८,८०,४८,४२३.९२/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
३) मागील तीन महिन्यात कोणताही निधी मुक्त करण्यात आलेला नाही.
४) मागणी क्र. यु - ४, ३४३५ परिस्थितीकी व पर्यावरण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (०१) पर्यावरण संरक्षण, (०१) (०१) राज्य नदी संवर्धन योजना (कार्यक्रम) (३४३५ १३२९), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.
५) मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचा यांच्याकडून पर्यावरण विभागास कोणतेही येणे बाकी नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१११४२५८७७०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Arun Vibhute

Digitally signed by Chandrakant Arun Vibhute
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8f5db4b58117f82ba510cc5eb279fa4eba706b24f6f921a77c28a792940c5517, cn=Chandrakant Arun Vibhute
Date: 2019.09.16 13:07:06 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
अवर सचिव (पर्यावरण)

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.
६. मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचा, जि. धुळे.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

९. मा. सर्व मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

१०. शासनाचे मा. मुख्य सचिव/ सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे खाजगी सचिव

११. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६ / अर्थसंकल्प - ७), मंत्रालय, मुंबई.

१२. नियोजन विभाग, कार्यासन क्र. १४७२, मंत्रालय, मुंबई.

१३. रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४. निवडनस्ती.

शासन निर्णय क्रमांक - रानयो २०१९/ प्र.क्र. १९/तां.क.३, दिनांक ११/०९/२०१९ सोबतचे "प्रपत्र - अ"

कोअर कामे (स्टोन पिचिंग व गॅबियन वॉल)				
अ.क्र.	**कामाचा प्रकार**	**प्रस्तावित किंमत (रूपयांमध्ये)**	**समितीचा निर्णय**	**समितीने मान्य केलेली रक्कम (रूपयांमध्ये)**
१	क्लिअरींग अँड ग्रबिंग लँड इनक्लुडींग अपरूटींग व्हेजिटेशन इ. (Item No RA१)	३,६७,४७७.१३/-	मंजूर करण्यात आला आहे.	३,६७,४७७.१३/-
२	एक्स्यव्हेशन ऑफ रोडवेज इन अर्थ, सॉईल ऑफ ऑल सॉर्टस्, सँड ग्रॅव्हेल ऑर सॉफ्ट मुरूम इनक्लुडींग ड्रेसिंग सेक्शन टू द रिक्वायर्ड ग्रेड (Item no RA २ to RA ५)	२,२४,०२,२०८/-	मंजूर करण्यास हरकत नसावी.	२,२४,०२,२०८/-
३	प्रोव्हायडींग अर्थ वर्क व इतर (Item no RA६ to RA १५)	९,२८,४९,३४२.७/-	एकूण प्रस्तावित रकमेच्या २०% रक्कम कमी करण्यात यावी.	७,४२,७९,४७४.१६/-
एकूण कोअर		११,५६,१९,०२७.८३/-		९,७०,४९,१५९.२९/-
नॉन-कोअर कामे				
अ.क्र.	**कामाचा प्रकार**	**प्रस्तावित किंमत (रूपयांमध्ये)**	**समितीचा निर्णय**	**समितीने मान्य केलेली रक्कम (रूपयांमध्ये)**
१	ट्रेचिंग इन ऑर्डीनरी सॉईल	१,०८,२७९.३६/-	मंजूर करण्यास हरकत नसावी.	१,०८,२७९.३६/-
२	अपरूटींग ऑफ विडस	७६७०.५०/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००
३	सप्लायिंग अँड स्टॅकींग ऑफ गुड अर्थ	६,५४,४५८.४०/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००
४	सप्लायिंग अँड स्टॅकींग ऑफ स्लज	९२,७१२.४८/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००
५	मिक्सिंग अर्थ अँड स्लज	५०,४२०.१६/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००

६	फिलिंग मिक्श्चर ऑफ अर्थ अँड स्लज ऑर इन डिजायर्ड प्रपोर्शन इन ट्रेंचेस	२५,२६९.१२/-	मंजूर करण्यास हरकत नसावी.	२५,२६९.१२/-
७	प्लांटेशन ऑफ ट्रीज, श्रब्ज, हेज ॲट साईट	११,२४१.२५/-	मंजूर करण्यास हरकत नसावी.	११,२४१.२५/-
८	प्लांटेशन ऑफ ट्रीज व इतर (Sr. no ८ to ४४ in the report)	२,०४,७५०/-	यामध्ये नमूद बाबी झाडांची रोपे आणून त्यांची लागवड करण्याबाबत आहेत त्यामुळे ह्या बाबी वेगवेगळ्या न दाखवता एकत्रित दाखवाव्यात जेणेकरून प्रस्तावित खर्च कमी होईल.	२,०४,७५०/-
एकूण कोअर		११,५४,८०१.२७/-		३,४९,५३९.७३/-
एकूण कोअर + एकूण नॉन कोअर		११,६७,७३,८२९.१०/-		९,७३,९८,६९९.०२/-

प्रकार	**प्रस्तावित रक्कम (रूपयांमध्ये)**	**समितीचा निर्णय**	**समितीने मान्य केलेली रक्कम (रूपयांमध्ये)**
सिव्हिल वर्क इस्टीमेट (कोअर कामे)	११,५६,१९,०२७.८३/-	प्रस्तावित रूपये ११,५६,१९,०२७.८३/- पैकी रूपये ९,७०,४९,१५९.२९/- इतकी रक्कम मंजूर	९,७०,४९,१५९.२९/-
लँड स्केप वर्क इस्टिमेट (नॉन कोअर कामे)	११,५४,८०१.२७/-	प्रस्तावित रूपये ११,५४,८०१.२७/- पैकी रूपये ३,४९,५३९.७३/- इतकी रक्कम मंजूर	३,४९,५३९.७३/-
एकूण	११,६७,७३,८२९.१०/-		९,७३,९८,६९९.०२/-
१२ % जी.एस.टी.	१,४०,१२,८५९.४६/-		१,१६,८७,८४३.८९/-
५ % कंटीजन्सि	५८,३८,६९१.४६/-	५ % ऐवजी १% करण्यात यावा.	९,७३,९८६.९९/-
२ % डब्ल्यू. सी. एक्सपेन्सेस	२३,३५,४७६.५८/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००

१.५ % टेक्निकल सर्व्हिस चार्जेस	१७,५१,६०७.४४/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००
३ % थर्ड पार्टी ऑडीट चार्जेस	३५,०३,२१४.८७/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००
३.५ % कसल्टन्सी	४०,८७,०८४.०२/-	हा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.	००
प्रस्तावित रक्कम	१४,८३,०२,७६२.९६/-		११,००,६०,५२९.९०/-

Chandrakant Arun Vibhute

Digitally signed by Chandrakant Arun Vibhute
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8f5db4b58117f82ba510cc5eb279fa4eba706b24f6f921a77c28a792940c5517, cn=Chandrakant Arun Vibhute
Date: 2019.09.16 13:07:51 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
अवर सचिव (पर्यावरण)

शासन निर्णय क्रमांक - रानयो २०१९/ प्र.क्र. १९/तां.क.३, दिनांक ११/०९/२०१९ सोबतचे "प्रपत्र - ब"

राज्य नदी संवर्धन योजनेतंर्गत दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद, जि. धुळे येथील अमरावती व भोगावती नदीच्या संवर्धन कामांसाठीच्या अटी व शर्ती.

१. प्रपत्र - अ मधील नमूद कामांना प्रथमत: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेण्यात यावी. तांत्रिक मान्यतेमध्ये प्रपत्र - अ मध्ये नमूद विषयवार असलेल्या खर्चाच्या किंमतीत बदल होत असल्यास याबाबत विभागास अवगत करण्यात यावे. योजनेच्या प्रत्येक टप्प्यात हाती घेण्यात येणाऱ्या कामाचे मंजूर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्रे इ. शासनाकडे काम सुरु करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. शासनास उपरोक्त माहिती सादर केल्यानंतरच कामे सुरु करण्यात यावीत. हाती घेण्यात यावयाच्या ("प्रपत्र-अ" मधील नमूद कामे) कामासंबंधित नदीच्या सद्यस्थितीची छायाचित्रे घेण्यात यावी. तसेच व्हीडीओ रेकॉडिंग करण्यात यावे. कामांच्या प्रगतीनुसार दर दोन महिन्यांनी याप्रकारे छायाचित्रण करण्यात यावे.

२. नदी संवर्धन क्षेत्रात तज्ञ व कामाचा अनुभव असलेली तसेच "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबी संबधीत तज्ञ व पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ असलेली संस्था /शासकीय प्राधिकरण/मंडळ यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था म्हणून मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे यांनी विहित पध्दतीने नियुक्ती करावी. ही संस्था "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबींचे स्थानिक डी. एस. आर. प्रमाणे खर्चाचे अंदाज, कामाचे आराखडे तयार करणे व तपासणे कामाची गुणवत्ता राखणे, सर्व कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे याबाबत वेळोवेळी समन्वय करेल. नगरपरिषदेने प्रकल्पासाठी तांत्रिक मनुष्यबळ तयार होण्यासाठी या संस्थेचा उपयोग करावा.

३. शासनाने वितरित केलेल्या निधीच्या विहित प्रमाणात मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद यांनी त्यांचा अनुज्ञेय हिस्सा स्वतंत्र खात्यात जमा करावा. सदर हिस्सा प्रकल्पावर खर्च केल्याशिवाय तसेच, प्रकल्पांतर्गत होणा-या कामांचे गुणवत्ता लेखापरिक्षण केल्याशिवाय पुढील हप्ता मुक्त करण्यात येणार नाही.

४. कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याची व कामाची गुणवत्ता राखण्याची संपूर्ण जबाबदारी ही मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद यांची असेल. सदर प्रकल्पाच्या कामासाठी लागणारा निधी खर्च करताना मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद यांच्या देखरेखेखाली करण्यात यावा.

५. प्रकल्पाची यथायोग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून प्रकल्प अंमलबजावणी समितीची मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात यावी. या समितीत नगरपरिषदेतील संबंधित अधिकारी, कर्मचारी, पर्यावरण विषयक तज्ञ, उपरोक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी यांच्यासह नगरपरिषदेस आवश्यक वाटतील अशा प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. ही समिती प्रकल्पांतर्गत होत असलेल्या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करेल व कामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवेल. सदर समितीची आढावा बैठक दर महिन्याला अयोजित करण्यात यावी.

६. नदीच्या निळ्या व लाल पूररेषेच्या दरम्यान काही कामे प्रस्तावित असल्यास सदर कामे करण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे.

७. प्रकल्प पूर्ण झाल्यावरही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या मदतीशिवाय नदीचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने योजनेची कामे पूर्ण झाल्यावरही ही समिती बैठका आयोजित करेल. ही समिती भौतिक बाबींची देखभाल, प्रकल्पांपासून मिळणारे उत्पन्न, प्रकल्प संवर्धनासाठी उपाययोजना व खर्च याबाबत आढावा घेत राहील.

८. काम पूर्ण झाल्यावर किमान पुढील १० वर्षापर्यंत नदीची देखभाल व दुरुस्ती नगरपरिषदेने स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच नगरपरिषदेने प्रकल्प अंमलबजावणी समितीचा अहवाल प्रत्येक ६ महिन्यांनी शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करेल.

९. नदीच्या पाण्याची गुणवत्ता चालू महिन्यापासून पुढे प्रत्येक महिन्याला तपासण्यात यावी. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रयोगशाळेची /संस्थेची /मंडळाची नियुक्ती करण्यात यावी. दर महिन्याचा पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सदर संस्था प्रकल्प सनियंत्रण समितीस व पर्यावरण विभागास दर तीन महिन्यांनी सादर करेल.

१०. उपरोक्त मुद्यानुसार केलेल्या कार्यवाही प्रमाणे मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद हे शासनास दर तीन महिन्याला खालील अहवाल सादर करतील.

अ. मंजूर कामांचा भौतिक प्रगती अहवाल
ब. पाण्याच्या गुणवत्ता अहवालाच्या प्रती
क. प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
ड खर्चाचे प्रत्येक तिमाहीचे उपयोगिता प्रमाणपत्र

११. सदर अहवाल सादर केल्याशिवाय कामाच्या पुढील टप्प्यातील निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. तसेच आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १० तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे. उपरोक्त मंजूर योजनेसाठी निधी उपलब्धतेनुसार अनुदान मुक्त करण्यात येईल.

१२. योजनेंतर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहित कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. हा निधी इतर दुस-या कोणत्याही कामासाठी वा नगरपरिषदेच्या कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळता करता येणार नाही. विशिष्ट कामासाठी मान्य केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची जबाबदारी मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद यांची राहील.

१३. या योजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्या अंतर्गत जमा करावा व बँकेत ठेवलेल्या निधीवर मिळणारे व्याज याच निधीत जमा करावे. या निधीच्या उपयोगितेवर नियंत्रण राहण्यासाठी खात्याचे संचालन मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद यांच्याव्दारे करण्यात यावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बॅकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणा-या पासबुकाची साक्षंकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

१४. योजना पूर्ण झाल्यावर या योजनेंतर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेपासून किंवा सोयीसुविधांपासून मिळणारे उत्पन्न हे या योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यातच जमा करण्यात यावे. या उत्पन्नातून नदी संवर्धनासाठी अतिरिक्त कामे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अनुमतीने हाती घेता येतील. मात्र नदी संवर्धनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी हा महसूली निधी वापरता येणार नाही.

१५. ही कामे शासन आदेशाच्या दिनांकापासून/धनादेशाच्या दिनांकापासून ३६ महिन्यात किंवा तत्पूर्वी पूर्ण करण्यात यावीत. ह्या कालावधीनंतर कामे पूर्ण करण्यासाठी लागणारा खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून करण्यात यावा.

१६. मंजूर बाबीतील खर्चामध्ये बचत झाल्यास बचत झालेला निधी योजनेतीलच दुस-या उपांगासाठी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगीने वापरता येईल.

१७. राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत निर्माण केलेल्या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च योजना कार्यान्वित झाल्यानंतर संबंधीत नगरपरिषदेने स्वत:च्या निधीतून भागावावयाचा आहे.

१८. योजनेंतर्गत खर्च करण्यात येणा-या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण स्थानिक निधी व लेखापाल यांच्याव्दारे करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण विभागास पाठविण्यात यावा. तसेच प्रत्येक आर्थिक वर्षा अखेर झालेलया खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत महालेखापाल कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषदेची राहील.

१९. नदीच्या कामांच्या प्रगतीच्या अहवालाची तसेच खर्चाच्या विवरणपत्राची पर्यावरण विभागाच्या सक्षम अधिका-यांकडून तपासणी करण्यात येईल व तपासणीच्या वेळी नगरपरिषदेने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

२०. योजनेवरील कामासाठी मान्यता प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झालेली रक्कम शासनाकडून उपलब्ध होणार नाही. या कामासाठी शासनाने अदा केलेली रक्कम जर त्या कामावर घालून दिलेल्या विविक्षित वेळेमध्ये खर्च होऊ शकत नसेल तर त्यास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल.

२१. योजनेवरील कामासाठी अदा केलेली रक्कम योग्यरितीने वापरली जात नाही किंवा कामाची योग्य ती प्रगती होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आल्यास शासन कोणत्याही क्षणी अशा कामांची प्रशासकीय मान्यता रद्दबातल करु शकेल.

२२. योजनेवरील कामांसाठी राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरिक्त शासनाकडून, वित्तीय संस्थांकडून वा आणखी कोणत्याही संस्थांकडून प्राप्त निधी या योजने अंतर्गत खर्च झाल्याचे दर्शविण्यात येऊ नये. (No Overlapping of schemes)

२३. योजनेचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी भेट देणा-या राज्य शासनाच्या अधिका-यांस आवश्यक त्या सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक असेल.

२४. योजनेंतर्गत शासनाच्या अनुदानातून तयार केलेली मालमत्ता, ज्या कामासाठी निर्माण केली आहे, त्याच कामासाठी वापरणे आवश्यक आहे व त्यासाठी ही मालमत्ता अभिलेखित करणे आवश्यक आहे.

२५. योजनेंतर्गत करण्यात येणा-या निरनिराळया कामांचे व समन्वयाचे काम राज्यस्तरावरील सनियंत्रण समितीव्दारे करण्यात येते. या समितीने कामाबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

२६. योजनेंतर्गत नगरपरिषदेच्या होणा-या आस्थापनेवरील व लागणा-या मनुष्यबळावरील खर्च संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेव्दारे करण्यात येईल. त्यासाठी या विभागाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

२७. योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे अभिलेख व छायाचित्रांसह पुरावे नगरपरिषदेने जतन करावेत. तसेच सदरबाबत अभिलेखामध्ये नोंद करुन ठेवावी.

२८. नदी संवर्धनाबाबत मंजूर कामांमध्ये नदीतील गाळ काढणे व सिल्ट ट्रॅप लावण्याच्या कामाचा समावेश असल्यास, नदीच्या गाळ काढण्याच्या कामाबरोबरच तसेच पावसाळयापूर्वी सिल्ट ट्रॅप लावण्याचे काम पूर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा नदीत पुन्हा गाळ जमा होऊ शकतो.

२९. नदीच्या कामास सुरवात करण्यापूर्वीची छायाचित्रे विभागास सादर करावीत.

३०. राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तीचे पालन करणे नगरपरिषदेस बंधनकारक राहील.

३१. योजनेंतर्गत किती लोकांना रोजगार उपलब्ध झाला याची नोंद ठेवावी.

३२. योजना कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने योजने करिता कोणतेही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नाहीत.

३३. योजनेंतर्गत मंजूर कामांच्या निविदा हया शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विहित प्रक्रियेचा अवलंब करुन स्विकाराव्यात. तसेच प्रकल्पांतर्गत मंजूर किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या निविदा स्विकारण्यात येऊ नयेत.

३४. ठेकेदाराने विहित वेळेत काम पूर्ण न केल्यास त्यांच्यावर दंड आकारण्याची तरतूद ठेवण्यात यावी.

३५. योजनांतर्गत झालेल्या सर्व खर्चाचा ताळमेळ वेळोवेळी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई व तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई/ नागपूर यांच्या कार्यालयाशी घालण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची असेल.

३६. योजना पूर्ण झाल्यावर भविष्यात नदीच्या उपयोगाबाबत व वापराबाबत किंवा नदीसंदर्भात कोणतीही नवीन कामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यास प्रथम राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात यावी.

३७. नदीच्या क्षेत्राबाबत, मालकीबाबत, राबविण्यात येणा-या कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच Surface floting wetland beds बाबत वा इतर संबंधित बाबींबाबत भविष्यात काही न्यायालयीन वा अन्य बाबी उदभवल्यास संबंधित अधिकारी तसेच मुख्याधिकारी, दोंडाईचा - वरवाडे नगरपरिषद सर्वस्वी जबाबदार राहील.

३८. उपरोक्त अटींव्यतिरिक्त राष्ट्रीय नदी संवर्धन संचलनालयाने नदी संवर्धन योजनेतंर्गत प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील नियम व अटींचे पालन करणे बंधनकारक राहील.

३९. राज्य नदी संवर्धन योजनेतंर्गत सचिव स्तरावरील प्रदत्त समितीच्या दिनांक ०९/०८/२०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील अटींचे व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.

Chandrakant Arun Vibhute

Digitally signed by Chandrakant Arun Vibhute
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8f5db4b58117f82ba510cc5eb279fa4eba706b24f6f921a77c28a792940c5517, cn=Chandrakant Arun Vibhute
Date: 2019.09.16 13:08:49 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
अवर सचिव (पर्यावरण)